माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १७५७/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. दादाजी महादेव देहारकर, आंबेकर लेआऊट, घुटकाळा वार्ड, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर-४४२४०२ | प्रशासन अधिकारी(शिक्षण), चंद्रपूर शहर महानगर पालिका, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर | उपायुक्त, चंद्रपूर शहर महानगर पालिका, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर |

**सुनावणी दिनांक :- ८.०१.२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित (प्रतिनिधी) | अनुपस्थित | अनुपस्थित (प्रतिनिधी) | उपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०४.०७.२०२२

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०७.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे :मागितलेली माहिती चुकीची दिली

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०७.०४.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०७.०४.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : १ जानेवारी २००६ ते ऑक्टोबर २००९

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : सुधारित अंश राशिक्रण चुकीचे करून माझ्या पेशंनद्ध मधून दरमहा जास्तीची कपात करीत असल्याबाबत

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते

१) चशमनपा/प्रभारी/१३५/२०२१ दि. २६.०८.२०२१ च्या पत्रात मा. उपायुक्त यांनी आपण दिलेल्या निवदेनावर सविस्तर चर्चा करून २० सप्टेंबर २०२१ पर्यंत विषयावर तोडगा काढण्यात येईल असे म्हटले आहे. तोडगा काढण्यासाठी सात महिन्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. त्यावर तोडगा कधी काढणार हयाची माहिती द्यावी

२) चशमनपा प्रभारी/१६४/२०२१ दि. २९.०९.२०२१ च्या पत्रात तक्रारदार श्री. दादाजी महादेव देहारकर सेवानिवत्त शिक्षक महानगरपालिका चंद्रपूर यांनी लोकआयुक्त व उप लोकआयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे सुधारित अंशराशीकरणाची रक्कम रु. १३१८४९ जमा केली असे म्हटले आहे, मी ही रक्कम केव्हा जमा केली हयाची माहिती द्यावी.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०२.०५.२०२२ रोजी माहितीच्या अधिकारात अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती छायांकित प्रत स्वरुपात पुरविण्याची तरतुद अधिनियमात आहे कार्यवाही करणे, प्रश्नांची उत्तरे देणे माहिती नव्याने तयार करून देणे माहिती अधिकारात अभिप्रेत नाही. मुद्दा क्र. २ नुसार अजून पावेतो सदरची रक्कम श्री. दादाजी देहारकर यांनी जमा केलेली नाही.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २५.०५.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २५.०५.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :माहिती चुकीची दिली

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी दि. २२.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून माहितीचे अधिकारात अभिलेखात उपलब्ध असलेली "असेल तशी माहिती" छायाप्रती स्वरुपात पुरविण्याची तरतुद अधिनियमात आहे. माहिती नव्याने तयार करून देणे, प्रश्नाची उत्तरे देणे किंवा कार्यवाही करणे माहितीचे अधिकारात अभिप्रेत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्पर कोणतीही माहिती दळविलेली नसल्याची खात्री झाल्याने अपिल अर्ज खारीज करण्यास हरकत नाही, असा आदेश पारित करण्यात आला.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा** –आज सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे लिपीक, चंशमनपा, चंद्रपूर ,महानगरपालिका, चंद्रपूर, श्री. प्रविण वासुदेव ईटनकर उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या तर्फे लिपीक, मनपा, चंद्रपूर, चंद्रपूर शहर श्री. गुरुदास मा. नवले उपस्थित आहेत. उपस्थित प्राधिकरणांनी सदर प्रकरणांची दस्ताऐवज सादर केली.

६. **निष्कर्ष —** सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) मा. उपायुक्त यांनी दि. २६.०८.२०२१ रोजीच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थी यांना देणे योग्य राहिल.

२) विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी घोषित करून दि. २६.०८.२०२१ रोजीच्या पत्रानुसार संबंधितावर काय कारवाई केली त्याची माहिती अपिलार्थी यांना पुरविणे आवश्यक आहे.

३) अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा. उपायुक्त यांना दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती प्रदान करणे अपेक्षित आहे.

सबब , खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(८)(क)(२) नुसार उपायुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२) विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, चंद्रपूर शहर महानगर पालिका, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७.०४.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

३) प्रस्तुतचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
*नागपूर*

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०८.०१.२०२५**

जावक क्रमांक 1715 दिनांक 27 MAR 2025